दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १६ जून २०२५ | अंक १७९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

आपल्याला हवी असणारी गोष्ट मिळिवण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तीव्र इच्छा शक्ती




# कुठे देवदर्शन ठरलं काळ तर कुठे फिरणं पडलं महागात; बुडून १० जणांचा दुर्दैवी मृत्यू!



सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. महाराष्ट्रभर पाऊस बरसत आहे. नदी नाल्यांना पूर आलेले आहेत. त्यामुळेच पर्यटणप्रेमी घराबाहेर पडून हिरवळीचा आनंद लुटत आहेत. मात्र याच कारणामुळे आज महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी दुर्दैवी घटना घडल्या आहेत. बुलढाण्यात नदीपात्रात अंघोळ करण्यासाठी गेले असताना दोन मायलेकींचा मृत्यू झाला आहे. तर पुण्यात इंद्रायणी नदीचा पूल कोसळल्याची घटना घडली. नांदेड, रायगड जिल्ह्यांतही अशाच काही घटना घडल्या. बुलढाण्यात काय घडलं?बुलढाण्यातील नांदुरा तालुक्यातील निंबोळा देवी येथे देवी दर्शन घेऊन त्रिवेणी संगम नदीपात्रात आंघोळ करीत असताना मायलेकींचा पाय घसरल्याने नदीपात्रात बुडून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. दरम्यान या दोघींना वाचविण्यासाठी गेलेल्या दोन महिलाही पाण्यात बुडत असल्याने त्यांनी आरडाओरड केला असता स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात येताच त्यांनी बचावकार्यास सुरुवात केली. यात दोन महिलांना वाचविण्यात यश आले असून मात्र दोन्ही मायलेकींचा पाण्यात बुडून करुण अंत झाला आहे.

दरम्यान नाकातोंडात पाणी गेल्याने पुनम जामोदे, वय 32 वर्षे आणि आरोही दामोदर वय 5 वर्ष या ह्या दोघीं मयलेकींचा मृत्यू झाला आहे.

## रायगडमध्ये काय घडलं?

रायगड, माथेरान, नवी मुंबई येथे राहणारे तिघे पर्यटक माथेरानच्या तळ्यात बुडाले आहेत. सुमित चव्हाण आर्यन खोब्रागडे, फिरोज शेख अशी बुडालेल्या पर्यटकांची नावे. नवी मुंबई येथून एकूण 10 जणांचा ग्रुप माथेरानमध्ये गेला होता. या ग्रुपमधील तिघे बुडाले आहेत. घटनेची माहिती मिळताच माथेरान पोलीस व सह्याद्री रेस्क्यू टीमकडून शोध कार्य चालू करण्यात आले आहे.

## नांदेडमध्ये काय घडलं?

बासरच्या गोदावरी नदीपात्रात बुडून पाच भाविकांचा मृत्यू झाला आहे. नांदेडच्या धर्माबाद सीमेलगत असलेल्या तेलंगणा राज्यातील बासर येथे ही घटना घडली आहे. सर्वजण हैदराबादहून बासर येथे आले होते. तिथे ते बोटेने नदीपात्रात गेले आणि बेटावरन उतरून स्नान करत होते. मात्र यावेळी ही घडली दुर्दैवी घटना घडली. मृतांमधील तिघे हे एकाच कुटंबातील आहेत.

# राज ठाकरे यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा

बीड प्रतिनिधी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवस यंदा खास पद्धतीने साजरा करण्यात आला. बीडमधील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राज्याच्या उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांच्या वतीने हा वाढदिवस अनाथ व बेघर नागरिकांसोबत साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अन्नदान करण्यात आले आणि गरजू नागरिकांना भरपेट जेवण दिले गेले. यानंतर परिसरात वृक्षारोपण



करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. राज ठाकरे यांच्या

प्रतिमेसमोर केक कापून उपस्थितांमध्ये वाटप करण्यात आले आणि वाढदिवसाचा आनंद सर्वांसोबत सामायिक करण्यात आला.दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्षाताई जगदाळे यांनी सामाजिक



बांधिलकी जपत जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात विविध उपक्रम राबवले. त्या या केंद्रातील बेघर, गरजू लोकांच्या मदतीस नेहमीच तत्पर असतात. वाढदिवसाच्या निमित्तानेही त्यांनी या परंपरेला पुढे नेत आपुलकीची भावना जोपासली.या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये बीड जिल्हाध्यक्षा आशाताई कुटे, जिल्हा उपाध्यक्षा कल्पनाताई कवठेकर, जिल्हा उपाध्यक्ष सदाभाऊ बिडवे, बीड शहराध्यक्ष पठाण अमर जान, शास्त्री कुटे, अभिजीत वैद्य आणि काळजीवाहक छायाताई यांचा सहभाग होता.कार्यक्रमादरम्यान मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला आणि सामाजिक जाणिवेचा आदर्श घालून दिला.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या कार्यालयासाठी आमदार धसांकडून मदत

बीड (प्रतिनिधी) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उपविभागीय कार्यालय मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात सुरू होत आहे. या कार्यालयाच्या स्थापनेसाठी आमदार सुरेश धस यांनी आपल्या वैयक्तिक पगारातून ४० हजार रुपयांचा धनादेश दिला. त्यांनी हा निधी कार्यालयासाठी देत योगदान दिले असून

यामुळे मराठा समाजातील होतकरू तरुणांना व्यवसाय व उद्योगासाठी चालना मिळणार आहे. राज्यातील मराठा समाजाच्या युवकांना स्वावलंबी करण्याच्या दृष्टिकोनातून अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ कार्यरत आहे. मराठवाड्यातील बीड जिल्हा हा कायमच दुष्काळग्रस्त व आर्थिकदृष्ट्या दुर्बल परिस्थितीत आहे. अनेक शेतकरी व बेरोजगार युवकांना रोजगार व उद्योगाच्या संधी मिळत नाहीत. अशा परिस्थितीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. महामंडळाच्या प्रशासनिक अधिकारी व अधिकाऱ्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे बीड येथे उपविभागीय कार्यालय सुरू होणार असून, यासाठी आमदार सुरेश धस यांनी ४० हजार रुपयांचा वैयक्तिक निधी दिला आहे. या कार्यालयाच्या स्थापने मुळे बीड जिल्ह्यातील तसेच पाटोदा तालुक्यातील मराठा समाजातील युवकांना महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे.

## माणुसकी जपत सामाजिक कार्यकर्त्याकडून बेवारस मयत व्यक्तीवर अंत्यसंस्कार
# नातेवाईकांनी नाकारले, परळीच्या नितीन शिंदेनी स्वीकारले

परळी वैजनाथ : बालाजी सोळंके नामक बेवारस व्यक्ती हा मागील २० वर्षापासून परळी शहरातील नेहरू चौक (तळ) परिसरात राहत होता.रस्त्याच्या बाजूला मयत झाल्याचे शनिवारी सकाळी दिसून आले.नितीन शिंदे यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात व पालिकेस कळवले. मयत सोळंके यांची परभणी शहरात वासत्वास असलेली रक्तातील नात्याची सखी बहीण असल्याची माहिती मिळाली पोलिसांनी त्यांच्याशी संपर्क केला असता भाऊ आणि माझा मागील २० वर्षांपासून काहीही संबंध नाही आसे मयताच्या सख्या बहिणीकडुण निर्दयीपणे सांगीतले व त्यांच्या भावाचा अंत्यविधी करण्यास त्यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला. त्यामुळे निर्माण झालेला पेच प्रसंग पाहता सामाजीक बांधिलकी व मृत्यु पश्चात होणारी मानवी देहाची अवहेलना होऊ नये या भावनेतुन परळी शहरातील सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या नितीन शिंदे, सेवकराम जाधव, शिवाजी देशमुख यांनी घटणेचे गांभिर्य पाहता



परळी शहरातील समाजकार्यात एक पाऊल पुढे असणाऱ्या व्यक्ती आणि पोलीस प्रशासणाच्या सहकार्याने मयत बेवारस बालाजी सोळंके यांचा अंत्यसंस्कार करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यानुसार पोलीस प्रशासन,नगर पालिका प्रशासन आणि परळी शहरातील सामाजीक क्षेत्रातील मान्यवरांनी मिळून शनिवार रोजी ५:३० वाजता परळीत सदरील बेवारस मयत व्यक्तीचा अंत्यविधी करण्याचा निर्णय घेतला या वेळी कर्तव्यावर आसलेल्या चरणसिंग वळवी (बीट हवलदार) पोलीस हेड कॉन्स्टेबल परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या समक्ष व अधिकृत सहमतीने सामाजीक कार्यकर्ते नितीन शिंदे, सेवकराम जाधव सर, शिवाजी देशमुख,वेगवान मराठीचे उपसंपादक पत्रकार केशवराव मुंडे आबासाहेब देशमुख, उत्तम मोरे यांच्यासह साजिद खान गुत्तेदार यांच्या दुकाना समोर रात्रीच्या वेळी सदरील मयत व्यक्ती आसऱ्याला झोपत आसे आणि त्यामुळे आपल्या दुकाणाचे संवक्षण होते याची जाण ठेऊण जाती धर्माचे बंधन तोडुण याप्रसंगी अंत्यविधी साठी लागणारे लाकडं (सरपन) दिले.तर बेकरी वाले माहेमूद खान, प्लम्बर नासिरभाई, अन्नू भाई व इतर बांधव देखील अंत्यविधीस उपस्थित होते. या वेळी उपस्थित शिवाजीराव देशमुख आणि केशवराव मुंडे यांच्या कडुण मयत बालाजी सोळंके यांच्या पार्थिवास पुष्पहार अर्पण करुण श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रतिष्ठित व सामाजिक क्षेत्राची जाण व आवड असलेल्या मोजक्याच मान्यवरांच्या उपस्थित परळी वैजनाथ येथील वैकुंठ धाम स्मशान भुमित मयत बालाजी सोळंके यांच्यावर हिंदु धर्माच्या रिती रिवाजा प्रमाणे अंत्यसंस्कार विधी करण्यात आला.

# वाळू चोरी प्रकरणात महसूल, पोलीस, एलसीबी अधिकारी सहभागी? - कारवाया फक्त नौटंकी!

उमापूर (प्रतिनिधी)जिल्ह्यात वाळू तस्करीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. शासनाकडून वेळोवेळी वाळू उपशावर नियंत्रण ठेवण्यासाठी आदेश देण्यात आले असतानाही, जिल्ह्यातील अनेक ठिकाणी दिवसाढवळ्या खुलेआम वाळू चोरी होत आहे. विशेष म्हणजे, या अवैध धंद्यामागे महसूल विभाग, पोलीस यंत्रणा आणि एलसीबी (स्थानीक गुन्हे शाखा) अधिकारी यांच्या संमतीनेच हे सर्व सुरू असल्याचा नागरिकांचा ठाम आरोप आहे. ङ्गकारवाईफ म्हणजे केवळ दिखावा? याआधीही अनेक वेळा वाळूच्या वाहनांवर छापे टाकून, मुद्देमाल जप्त करण्यात आला. छाप्यांचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. परंतु काही दिवसांनी तेच ट्रॅक्टर, डंपर पुन्हा चोरीच्या कामात दिसले. त्यामुळे झालेल्या कारवाया या केवळ कागदोपत्री कार्यवाही असून, प्रत्यक्षात कोणताही ठोस बदल झालेला नाही. मम ाठे गमकफ काय? कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेला वाळूचा हा काळा धंदा स्थानिक अधिकाऱ्यांच्या आशीर्वादानेफ्व सुरू असतो, अशी चर्चा सर्वत्र आहे. हेच कारण आहे की, एवढ्या मोठ्या प्रमाणात कारवाया होऊनही वाळू चोरी थांबत नाही. दरम्यान, खोट्या कारवाया करून लोकांची दिशाभूल करण्यात येते आणि खरी मूळ साखळी कायम राहते. नागरिकांचे सवाल - जबाबदारी कोणाची? महसूल विभाग व पोलिसांनी कारवाई केलीच असेल, तर मग पुन्हा चोरी का सुरू होते? वाळू तस्करी करणाऱ्यांवर ठोस गुन्हे दाखल का होत नाहीत? स्थानिक पातळीवरील काही सरपंच, ग्राम सेवक यांचीही सहभागिता का विचारात घेतली जात नाही? जनतेची मागणी - सखोल चौकशी व जबाबदारी निश्चित करा या प्रकरणी केवळ ट्रॅक्टर पकडून फोटो काढणं पुरेसं नाही, तर वाळू तस्करीच्या साखळीतील सर्व घटकांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. जिल्हा प्रशासनाने विशेष तपास पथक नेमून वास्तविक दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे, अशी मागणी आता जोर धरत आहे. ---

# बीडमध्ये एन.के.कॉलनीत युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते विकासकामांचे उद्घाटन



बीड (प्रतिनिधी)दि.१५ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत बीड शहरातील पेठ बीड येथील एन.के.कॉलनीत रविवारी (दि.१५) स्थानिक निधीतून झालेल्या विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले.या कामांमध्ये ओपन स्पेसमधील उद्यान, कंपाऊंड भिंत, मंदिर परिसराची सुशोभीकरण अशी कामे समाविष्ट आहेत. यावेळी नागरिकांशी थेट संवाद साधताना डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले की, या भागाच्या विकासासाठी स्थानिक निधीतून कामे झाली असली तरी येणाऱ्या काळात शासनस्तरावर देखील पाठपुरावा करून अधिक निधी आणण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. या कार्यक्रमाला नगरसेवक प्रेम चांदणे, ॲड. विकास जोगदंड, रामसिंग टाक, अमर डागा, ओमप्रकाश तोतला, प्रकाश गायकवाड, शारदा डुलगज, रमेश गुरसाळी यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, डॉ.क्षीरसागर यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.



सुजल प्रल्हाद येळापुरे याला एमबीबीएस पूर्व परीक्षा ( नीट ) मध्ये ४९६ गुण मिळाल्याबद्दल. मा.आ.लक्ष्मण ( आण्णा ) पवार यांनी येळापुरे सरांच्या घरी जाऊन त्यांच्या मुलाचा यथोचित सन्मान केला व त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नाळवंडीसह ग्रामीण रस्ते कामांसाठी नियोजित आजचे रास्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित
## सरपंच ॲड.राजेंद्र राऊत यांची माहिती; प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर निर्णय

प्रतिनिधी बीड दि.१५ : तालुक्यातील नाळवंडी (ता. बीड) येथील मौज ते नाळवंडी (व्ही.आर. नं. २४३) या रस्त्याचे काम रस्ते सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर झाले असले तरी, सहा महिन्यांनंतरही प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. अशी बीड तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक कामे आहेत. ही सर्व कामे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अडथळ्यांमुळे रखडली असून, ग्रामपंचायतीने याविरोधात जरुड फाटा (ता.बीड) येथे सोमवारी (दि.१६) रास्ता रोको आंदोलनाची हाक दिली होती. मात्र प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्याने हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे, अशी माहिती सरपंच ॲड.राजेंद्र राऊत यांनी दिली आहे.बीड तालुक्यातील नाळवंडीसह इतर रस्त्याच्या कामासंबंधी कार्यारंभ आदेश ६ महिन्यांपूर्वीच देण्यात आला



असूनही, आमदार संदीप क्षीरसागर यांनी ङ्या कामाचे भूमिपूजन माझ्याशिवाय होऊ नयेफ असा अडसर निर्माण केल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप एकाही कामाचे मार्कआऊट झालेले नाही. यामुळे नाळवंडी गावासह बीड तालुक्यातील अनेक ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे रखडली आहेत. या संदर्भात ग्रामपंचायतीने वेळोवेळी निवेदने देऊन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. अखेर १६ जून रोजी जरुड फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मध्यस्थीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर. पी. तोंडे व उपविभागीय अभियंता सी. पी. बोराडे यांनी संपर्क साधून, लेखी पत्राद्वारे आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली. त्यांनी लवकरच भूमि पूजन करून, पावसाळ्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल असे लेखी आश्वासन दिले. तसेच सद्यस्थितीत रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवले जातील, असे तोंडी आश्वासनही दिले. या लेखी खात्रीच्या पार्श्वभूमीवर नियोजित रास्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात येत असल्याचे नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत यांनी जाहीर केले. मात्र प्रशासनाने आश्वासनांची अंमलबजावणी वेळेत न केल्यास भविष्यात अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही ॲड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १६ जून २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## चिंताजनक विमान दुर्घटना

सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ -८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली. या भीषण अपघाताने सर्वांचेच मन हेलावले. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला. या दुर्घटनेनंतर संपूर्ण जगभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात विमान दुर्घटना घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा बळी गेल्याची ही पहिली घटना नाही याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि त्यात अनेक प्रवाशांचा जीव गेला आहे. गेल्याच वर्षी दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते. २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहारांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाला पण अपघाताचे कारण अद्यापही समजू शकले नाही. सरकारने या विमान अपघाताची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला आहे. हा चौकशी आयोग या अपघाताची सखोल चौकशी करील त्यामुळे लवकरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही. पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमानता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारतातही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. काँग्रे`स नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता विजय रूपाणी यांच्या नावाचीही भर पडली आहे. तीन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे.

# जीवनात प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहणारे फक्त माय-बापच!

वडिलांचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारला पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी पितृदिन (फादर्स डे) १५जून २०२५ रोज रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई वडील या शब्दावरूनच सहज समजून येते. या जगात माय बापा शिवाय मोठा कोणीही नाही. आई-वडील, माय बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही. कारण आई- वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी या शब्दाशी घनिष्ठ व निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती,संस्कार,संस्कृती,जडण घडण सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई वडीलांची भुमिका समान असते. आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.वडीलांचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजेच. परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी पितृ दिनाला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे.त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली.१९०७ मध्ये प्रथमच पितृदिन अनधिकृतपणे साजरा करण्यात आला. यानंतर अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन(मदर्स डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर्स ड`) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला कुठेही तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका काकु,माऊशी-मावसा, आत्या मामा,ताई-दादा,आजी-आजोबा इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी -पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल. मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे वडिलांच नात असते.वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते व पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल फक्त आईलाच कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की मुला मुलीनसाठी आकाश-पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही.आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते.आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक- तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही.म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई वडीलच त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे. एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. म्हणजेच वडील तीथेच नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक पितृदिन दीसुन येईल. माझ्यामते पितृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज का साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई-वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.पितृत्व दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृती जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई वडीलांची सेवा करता येईल. पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी- आजोबा, काका काकु,मामा-मामी, आत्या मामा,ताई-दादा इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. त्यामुळे अंकल-न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबर मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मान अवश्य होईल असे मला वाटते.आपण १५ जूनला पितृदिन (फादर्स ड`) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने निसर्ग दिवसेंदिवस कोपत आहे. याकरीता जागतिक पितृत्व दिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल. यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल. कारण आज बदलत्या हवामानामुळे निसर्ग दिवसेंदिवस ढासळत आहे. त्यामुळे आई-वडीलांपेक्षा मोठी आणि महान म्हणजे धर्तीमाता (पृथ्वी) ज्यामुळे आज आपण या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत.परंतु वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याने पृथ्वीमाता आज धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.त्यामुळे तीला वाचविण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आली आहे. करिता पृथ्वीला आई वडीलांचा दर्जा देवून मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षलागवड व्हायला हवी. यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूच्या रक्षणासाठी मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित ठेवण्यासाठी आणि ऑक्सिजनची मात्रा वाढविण्याच्या दृष्टीने हा आगळावेगळा उपक्रम ऐतिहासिक ठरेल.

# ना.पंकजाताई मुंडे यांचे देशी गोवंश संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

मुंबई-प्रतिनिधी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मु ंडे यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, दरवर्षी २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा अध्यादेश सरकारने निर्गमित केला आहे. यापूर्वीच देशी गायीस राज्यमाता-गोमाता म्हणून घोषित करण्यात आले असून, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ यांसारख्या देशी गायींच्या जाती आढळतात. मात्र, कमी उत्पादनक्षमता व प्रजननक्षमतेमुळे या गायींच्या संख्येत सातत्याने घट होत चालली आहे. यामुळे त्यांचे जतन व संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, देशी गायींचे जतन व संवर्धन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करून अधिक उत्पादनक्षम देशी गायी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने घेतले आहे. यासोबतच देशी गायींच्या दुधाचे, शेणाचे, गोमुत्राचे उत्पादन व विपणन यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. २२ जुलैला विविध उपक्रमांचे २२ जुलैला विविध उपक्रमांचे २२ जुलैला विविध उपक्रमांचे २२ जुलैला विविध उपक्रमांचे २२ जुलैला विविध उपक्रमांचे आयोजन आयोजन आयोजन आयोजन आयोजन शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन साजरा करताना चर्चासत्रे, शिबिरे, प्रदर्शने व विविध स्पर्धा यांचा समावेश असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. राज्य शासनाच्या आयुक्त, पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या संयुक्त विद्यमाने या दिवसाचे आयोजन करण्यात येणार असून, यासाठी लागणारा खर्च गोसेवा आयोगाच्या निधीतून करण्यात येणार आहे. राज्यातील देशी गोवंशाच्या जतनासाठी व लोकजागृतीसाठी शासनाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह ठरत असून, स्थानिक देशी गायांच्या संवर्धनासाठी एक सकारात्मक पाऊल असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# आधार नोंदणी केंद्राच्या सेवा वेळेत व पारदर्शक द्या : जिल्हाधिकारी राहुल कर्डीले

## आधार केंद्र चालकांनी अतिरिक्त शुल्क आकारल्यास होणार कारवाई

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मागील काही दिवसांपासून नांदेड जिल्ह्यातील आधार केंद्रावर नागरिकांची खूप गर्दी दिसून येत आहे. यामुळे अनेक नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सध्या सर्व शासकीय योजनांच्या मुळाशी आधार असून ते अपडेट नसेल तर नागरिकांना योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे आधार केंद्र चालकांनी आधार नोंदणी व सुधारणा केंद्रांवर येणाऱ्या नागरिकांना वेळेत व पारदर्शक सेवा पुरवाव्यात. आधार केंद्र चालकांनी त्यांच्या कार्यप्रणालीत अधिक सुधारणा करून नागरिकांच्या सोयीसाठी जबाबदारीने काम करावे. नागरिकांकडून अतिरिक्त शुल्क आकारल्यास त्यांच्या विरुध्द कडक कारवाई केली जाईल, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे नांदेड जिल्ह्यातील सर्व आधार नोंदणी चालकांसाठी कार्यशाळा आयोजित केली होती, यावेळी ते बोलत होते. कार्यशाळेस निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर तसेच जिल्ह्यातील आधार केंद्र चालकांची उपस्थिती





होती. नागरिक अनेकदा आधार अपडेट अथवा नवीन नोंदणीसाठी आधार केंद्रात येतात, मात्र वेळेवर सेवा न मिळाल्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागतो. केंद्रावर उपस्थित कर्मचारी यांनी वेळेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने नागरिकांना सेवा द्यावी. तसेच याबाबत काही अडचणी किंवा शंका असतील तर त्या भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरणाचे सहायक प्रबंधक, यूआईडीएआई क्षेत्रीय कार्यालय मुंबईचे महेश शिंदे यांच्या मदतीने सोडवाव्यात. आधार नोंदणी करताना येणाऱ्या शंका व अडचणीचे निरसन करुन घ्यावे, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी स्पष्ट सांगितले. तालुक्याच्या ठिकाणी जे आधार नोंदणी केंद्र आहेत तिथे संबंधित तहसिलदारांनी भेट देवून पाहणी करावी. ज्या आधार केंद्र चालकांची कामगिरी सुमार दर्जाची आहे त्यांनी त्यांच्या कामात सुधारणा करुन घ्यावी, असेही निर्देश जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले. यावेळी मुंबई यूआईडीएआई क्षेत्रीय कार्यालयाचे महेश शिंदे यांनी आधार केंद्र चालकांना सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. आधार केंद्र चालकांनी दैनंदिन कामकाज पार पाडताना येणाऱ्या शंका व अडचणी सोडविण्यासाठी प्रश्न विचारले त्यावर त्यांच्या अडचणी व शंकाचे निरसन केले. नवीन आधारकार्ड तयार करणे व सुधारणा करतांना महत्त्वपूर्ण असलेल्या अनेक बाबींची माहिती यावेळी दिली.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १६ जून २०२५
https://lokaarambh.com





## शाळा चि घंटी वाजणार म्हटल्यावर स्टेशनरी दुकानांमध्ये खरेदीसाठी झुंबड

बीड, दि. १५ आज शाळा सुरू होत असल्याने शहरातील स्टेशनरी दुकाने विद्यार्थ्यांनी फुलून गेली आहेत. पुस्तकं, वही, कंपास यांची खरेदी करण्यासाठी दिवसभर पालक-विद्यार्थ्यांची धावपळ सुरू होती. काही ठिकाणी पुस्तकांचा तुटवडा जाणवत असून दुकानदारांनी वेळ वाढवून दुकाने सुरू ठेवली आहेत.
छायाचित्र एन. के.खान

# 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' – मंत्री प्रताप सरनाईक राज्य परिवहन महामंडळ विशेष मोहिम राबविणार

-जून 15, 2025मुंबई, दि. १५: शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनीसाठी 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही मोहिम राबविण्यात येणार असून आता एसटीचे पास थेट त्यांच्या शाळा-महाविद्यालयात वितरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा १६ जूनपासून सुरू होत आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास



केंद्रावर जाऊन रांगेत पास घ्यावे लागत होते किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनकडून पास घेतले जात असत. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत ताटकळावे लागणार नाही. त्यांच्या शाळा – महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून संबंधितांना त्यांचे पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. यामुळे त्यांचा शैक्षणिक वेळ वाया जाणार नाही. एसटी महामंडळाच्या माध्यमातून 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही विशेष मोहीम १६ जूनपासून राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन पासची आवश्यकता असणाऱ्या शाळेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना होणार असल्याचेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले आहे.

# गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांचे 'इस्रो'ला ऐतिहासिक उड्डाण मुख्यमंत्र्यांकडून विमानतळावर विद्यार्थ्यांना शुभेच्छा

गडचिरोली/नागपूर, १५ जून : गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम, नक्षलग्रस्त भागातील आणि आर्थिक मागास कुटुंबांमधील विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. समाज कल्याण विभागाच्या सिरोंचा, वांगेपल्ली (अहेरी) आणि नवेगाव (गडचिरोली) येथील निवासी शाळांमधील १२० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विमानप्रवासाद्वारे बंगळूरु येथील इस्रो (ISRO) केंद्राला भेट देण्यासाठी उड्डाण केले. विशेष म्हणजे, यातील अनेक विद्यार्थ्यांनी यापूर्वी साधी रेल्वेही पाहिली नव्हती, किंवा जिल्ह्याचे मुख्यालयही पाहिले नव्हते. त्यांच्या या स्वप्नवत प्रवासाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर येथे उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत ते कुठे जात आहेत, कसे जाणार आहेत आणि काय पाहणार आहेत, असे आपुलकीने विचारले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत "मुलांनो, खूप खूप अभ्यास करा



आणि यशस्वी व्हा," या शब्दात प्रेरित केले. आदिवासी विकास मंत्री आणि इतर मान्यवरांकडूनही शुभेच्छा आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके आणि गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा,सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनीही विमानतळावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. सचिन मडावी यांच्या संकल्पनेतून साकारली योजना या अभिनव उपक्रमाची संकल्पना सहाय्यक आयुक्त (समाजकल्याण) डॉ. सचिन मडावी यांनी मांडली होती. जिल्हाधिकारी पंडा यांनी त्यास तत्काळ मंजुरी दिली. तसेच पालकमंत्री देवेंद्र फडणवीस व सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांनी या योजनेसाठी निधी मंजूर केला. तत्पुर्वी गडचिरोली येथून या विद्यार्थ्यांना बसद्वारे हिरवी झेंडी दाखवून नागपूर विमानतळावर रवाना करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, निवासी उपजिल्हाधिकारी सुनील सुर्यवंशी, प्रकल्प अधिकारी चेतन हीवंज या प्रसंगी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील या अविस्मरणीय क्षणाला त्यांच्या पालकांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू पाहायला मिळाले. इस्रो भारतीय अवकाश संशोधन संस्था (ISRO) ही भारत सरकारची राष्ट्रीय अवकाश संस्था असून, उपग्रह, रॉकेट आणि अवकाश तंत्रज्ञान विकासासाठी कार्यरत आहे. जगभरात भारतीय अंतराळ प्रगतीचे प्रतीक म्हणून इस्रो ची ओळख आहे.

## इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला शोक

## दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी; मदत कार्याला तातडीने वेग

मुंबई, दि.15: पुणे जिल्ह्यातील तळेगावनजीक इंदोरी येथे इंद्रायणी नदीवरील एक पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेचे वृत्त ऐकुन अतिशय दुःख झाले. या घटनेत प्राथमिक माहितीनुसार 2 लोकांचा मृत्यू झाला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत अशा भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या आहेत.

शोक संदेशात मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, या घटनेसंदर्भात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक आणि संबधित तहसीलदार यांच्याशी मी सातत्याने संपर्कात आहे. काही जण वाहून गेल्याने त्यांचा युद्धपातळीवर शोध घेतला जात आहे. विभागीय आयुक्त घटनास्थळाकडे रवाना झाले आहेत. घटनास्थळी एनडीआरएफला पाचरण करण्यात आले आहे. मदत कार्याला तातडीने वेग देण्यात आला आहे. 6 जणांना आतापर्यंत वाचविण्यात यश आले आहे. सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. 32 लोक जखमी झाले, त्यापैकी 6 गंभीर आहेत. त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## कुंडमळा-मावळ येथील पूल दुर्घटना अत्यंत दुर्दैवी; स्थानिक नागरिक आणि प्रशासनाकडून तातडीने मदत व बचावकार्याला सुरुवात दुर्घटनेच्या कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार - उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई, दि. 15 :- मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेली दुर्घटना दुर्दैवी, वेदनादायी असल्याचे सांगत या दुर्घटनेच्या कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. दुर्घटनेत काही नागरिक व पर्यटक नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची प्राथमिक माहिती आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, स्थानिक प्रशासनाने तात्काळ दुर्घटनास्थळी पोहचून बचाव आणि मदतकार्य सुरू केले. जिह्ला प्रशासन, राष्ट्रीय आपत्कालीन प्रतिसाद दलही (NDRF) दुर्घटनेनंतर अल्पावधीतच घटनास्थळी पोचले असून त्यांनीही बचाव व मदतकार्यास सुरुवात केली आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, "कुंडमळा येथे स्थानिक प्रशासनाने तातडीने मदत आणि बचावकार्य सुरू केले आहे. जखमी नागरिकांना आवश्यक सर्व वैद्यकीय उपचार उपलब्ध करण्याचे निर्देशित देण्यात आले आहेत. या पुलाची अवस्था जीर्ण असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले असून, देखभालीबाबत कोणतेही दुर्लक्ष झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल," असेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.राज्य शासन या संकटाच्या काळात बाधित नागरिकांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, जखमींना आवश्यक ती वैद्यकीय मदत शासनामार्फत तातडीने दिली जाईल. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत यंत्रणांकडून मिळणाऱ्या माहितीवरच विश्वास ठेवावा. आपण सर्वांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

## वसईच्या भूमीवर पहिली महिला बौद्धाचार्य

### आयु. प्रांजलीताई प्रविणजी काळबेंडे यांना मानाचा बहुमान



आयुष्यमानिनी प्रांजलीताई प्रविणजी काळबेंडे यांनी बौद्धाचार्य परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत दुसरा क्रमांक पटकावला आणि बौद्धाचार्य ही पदवी मिळवली. विशेष म्हणजे त्या वसई परिसरातील (सि. जा. संघ. वसई) पहिल्या महिला बौद्धाचार्य ठरल्या असून त्यांनी वसईच्या धम्म चळवळीत नवा इतिहास घडवला आहे. याप्रसंगी आनंद हेंडवे (अध्यक्ष, बौद्ध सहाय्य मित्र मंडळ) तसेच सदस्य अवधूत शेंडे, आनंद मनोहर, भास्कर गावंडे, प्रल्हाद दहाट, दिलीप बनसोड, सुजीत गवई, प्रविण काळबेंडे (पती),अमीत प्रविण काळबेंडे (मुलगा) यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील धम्मकार्याच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. धम्मचक्र प्रवर्तनाच्या या कार्यात प्रांजलीताईंचे योगदान निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असे गौरवोद्गार उपस्थितांनी काढले.

## 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात संचालक डॉ. विनोद मोहितकर यांची मुलाखत

मुंबई दि. 13 : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात 'तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाचे स्वरूप व प्रवेश प्रक्रिया' या विषयासंदर्भात राज्य तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. राज्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष 2025-2026 साठी राज्य तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेमुळे राज्यातील तरुणांना व्यावसायिक आणि करिअर उभारणाऱ्या गुणवत्तापूर्ण तंत्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. यावर्षी प्रवेश प्रक्रियेत ई-कौन्सिलिंगची संकल्पना प्रथमच राबवण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम अशा पद्धतीने मार्गदर्शन आणि प्रवेशाची संधी मिळणार आहे. संचालनालयामार्फत यावर्षी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' ही संकल्पनाही प्रत्यक्षात आणण्यात आली आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक प्रयोगशाळा आणि उद्योगानुसार सुसंगत कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार




आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी अर्ज कसा करायचा, पात्रता काय आहे, अभ्यासक्रमाचे स्वरूप कसे आहे आणि त्यामधून रोजगाराच्या संधी कशा खुल्या होतात या सर्व गोष्टींची सविस्तर माहिती संचालक डॉ. मोहितकर यांनी 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमातून दिली आहे. 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. 17 जून 2025 रोजी दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून रात्री 8.00 वाजता प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवर खाली दिलेल्या लिंकवरून ही मुलाखत पाहता येणार आहे. निवेदक डॉ. मृण्मयी भजक यांनी ही मुलाखत घेतली आहे.
एक्स- https://twitter.com/MahaDGIPR,
फेसबुक - https://www.facebook.com/MahaDGIPR,
यू ट्यूब - https://www.youtube.co/MAHARASHTRADGIPR

# मदिलखुलास कार्यक्रमात संचालक सतिशकुमार खडके याची मुलाखत

मुंबई दि. १३ : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित मदिलखुलासफ कार्यक्रमात मआपत्ती पूर्व व आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी करण्यात आलेले नियोजन व अंमलबजावणीफ या विषयासंदर्भात राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक सतिशकुमार खडके यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. दिलखुलासफ कार्यक्रमातून ही मुलाखत सोमवार दि. १६, मंगळवार दि.१७, बुधवार दि.१८, गुरुवार दि. १९ आणि शुक्रवार दि.२० जून २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व ङ्गन्यूज ऑन एआयआरफ्ञा म ोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. निवेदक सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे.

आजच्या बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर वाढते तापमान, वेळी-अवेळी पडणारा पाऊस आणि इतर अनपेक्षित नैसर्गिक घटना यामुळे आपल्यासमोर अनेक आव्हाने उभी राहात आहेत. नैसर्गिक आपत्तींपासून ते मानवनिर्मित आपत्तींपर्यंत आणि आगीसारख्या दुर्घटनांपर्यंत अनेक घटनांचा आपल्याला सामना करावा लागत आहे. या संकटांचा शास्त्रशुद्ध, प्रभावी आणि सुसंघटित पद्धतीने साम ना करण्यासाठी शासनाकडून सातत्याने विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,




राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ही त्रिस्तरीय यंत्रणा अखंडपणे कार्यरत असून, आपत्तीपूर्व नियोजन, तत्काळ प्रतिसाद आणि पुनर्वसन या सर्व टप्प्यांवर ही यंत्रणा सजगतेने काम करत आहे.आपत्ती टाळता यावी आणि आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांचे जीवित आणि मालम त्तेचे संरक्षण व्हावे, यासाठी विविध स्तरांवर नियोजनबद्ध कार्यवाही केली जाते. गावपातळीवर स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्याशी समन्वय साधून, सामूहिक जबाबदारीने आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कशा प्रकारे नियोजन केले जाते. या विषयावर मदिलखुलासफ कार्यक्रमातून संचालक श्री.खडके यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १६ जून २०२५
https://lokaarambh.com



# इराणकडून डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येचा कट?

## इस्त्रायल पंतप्रधान नेतन्याहू यांचा खळबळजनक दावा

इस्त्रायल आणि इराण यांच्यात संघर्ष सुरु आहे. दोन्ही देशांकडून क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले जात आहे. या दरम्यान इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी मोठा दावा केला आहे. इस्लामी शासक इराणकडून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येचा कट आखण्यात आला आहे. ट्रम्प यांनी इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम रोखण्याचा निर्णय घेतल्यामुळे इराणकडून त्यांचा हत्येचा प्रयत्न झाला, असे नेतन्याहू यांनी म्हटले आहे. बेंजामिन नेतन्याहू यांनी सांगितले की, डोनाल्ड ट्रम्प एक निर्णायक नेते आहेत. त्यांनी कधी इतरांप्रमाणे कमकुवतपणे सौदेबाजी करण्याचा मार्ग निवडला नाही. गुप्तचर संस्थांचे म्हणणे अगदी बरोबर होते. इराण अण्वस्त्रे बनवण्याच्या जवळ पोहचला होता. इराणकडून युरेनियमपासून अण्वस्त्र बनवले जाणार होते. इराण महिन्याभरात अण्वस्त्र चाचणी करणार होता. एका वर्षात त्यांच्या हातात अण्वस्त्रे असते. इराणवर गंभीर आरोप इस्त्रायलाचे पंतप्रधान बेंजामिन



नेतन्याहू यांनी दावा केला की, इराणने त्यांच्या प्रॉक्सी फोर्सेसच्या मदतीने ट्रम्प यांची हत्या करण्याचा दोनदा प्रयत्न केला. त्यांनी यासंदर्भात हिजबुल्लाह आणि हमासकडे लक्ष वेधले. डोनाल्ड ट्रम्प इराणचा पहिल्या क्रमांकाचा शत्रू आहे. त्यांच्याकडून अमेरिका मुर्दाबाद, अशा घोषणा दिल्या जातात. इराक आणि अफगाणिस्तानमध्ये इराणने अमेरिकेच्या विरोधात काम केले. बेरुतमधील २४१ अमेरिकन सैनिकांच्या मृत्यूसाठी इराणच जबाबदार आहे. इराणच्या इशाऱ्यावरुनच वॉशिंग्टनमधील हॉटेलमध्ये बॉम्बस्फोट झाले आणि अमेरिकेचे झेंडे जाळण्यात आले. पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटले की, इराणसारख्या राष्ट्राकडे अणू बॉम्ब असावा आणि तो तुमच्या शहरावर येऊन कोसळावा, अशी अपेक्षा आहे का? असा प्रश्न नेतन्याहू यांनी उपस्थित केला. त्यामुळे आमची जबाबदारी आहे की, आम्ही स्वत:चेही संरक्षण करावे आणि जगाचीही मदत करावी. इराण ट्रम्प यांच्या हत्येबरोबर माझ्याही हत्येच्या तयारीत होता, असा दावाही त्यांनी केला. इराणाविरोधात इस्त्रायलने शुक्रवारीऑपरेशन रायजिंग लॉयन राबवले. त्यानंतर इराणकडूनही इस्त्रायलवर हल्ले करण्यात आले.

## चकलांबा पोलिसांना दिसत नाही, बीडच्या स्थागुशा पोलिसांना दिसते नागरिकांचा संतप्त सवाल

## राक्षस भुवन येथे मोठी कारवाई, १७ लाख ६ हजारांचा अवैध वाळू उपसाचा मुद्देमाल जप्त

बीड (प्रतिनिधी):बीड जिल्ह्यात अवैध वाळू उपशाच्या वाढत्या प्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिस अधीक्षक मा. नवनित कॉवत यांनी सर्वच पोलीस अधिकाऱ्यांना कठोर कारवाईचे आदेश दिलेले असताना, चकलांबा पोलीस ठाणे क्षेत्रात अवैध वाळू उपसा चालू असल्याचे वारंवार नागरिकांकडून निदर्शनास येते. मात्र स्थानिक चकलांबा पोलिसांना हा प्रकार मदिसतफ नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया आता नागरिकांतून उमटत आहे.परंतु याच ठिकाणी बीड येथील स्थानिक गुन्हे शाखा (स्थागुशा) च्या पथकाने कारवाई करत सुमारे १७ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याने स्थानिक पोलिसांवर संशयाच्या सावल्या पडल्या आहेत.



मा. पोलीस अधीक्षक बीड यांच्या निर्देशानुसार पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड (स्थागुशा, बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पो.उ.नि. महेश विघ्ने व त्यांच्या पथकाने दिनांक १५ जून २०२५ रोजी चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील राक्षस भुवन नदीपात्रावर छापा टाकून मोठी कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे राक्षस भुवन येथील नदीपात्रात अक्षय पोटफफडे आणि करण पोटफफडे हे दोन इसम कोणताही अधिकृत परवाना नसताना, ट्रॅक्टर व लोडरच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा करत असल्याचे निष्पन्न झाले.कार्यवाहीत सहभागी अधिकारी: पोउपनि महेश विघ्ने स.फो जयभाये पोह/ राजु पठाण महेश जोगदंड राहुल शिंदे पो.अं. बप्पासाहेब घोडके चालक सुनील राठोड नागरिकांचा सवाल:

### यावेळी त्यांच्या ताब्यातून खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला:

२ ट्रॅक्टर, लोडर, ट्रॉली सुमारे १.५ ब्रास वाळू एकूण किंमत: □१७,०६,००० दोघांनाही चकलांबा पोलीस ठाण्यात हजर करून पोउपनि महेश विघ्ने यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली असून, गु.र.नं २१३/२०२५ खाली भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या कारवाईने एक गोष्ट स्पष्ट झाली आहे बीडच्या स्थागुशा पोलिसांना जे अवैध धंदे मदिसतातफ, ते स्थानिक चकलांबा पोलिसांना का दिसत नाहीत? हा प्रकार दुर्लक्ष आहे की संगनमत याबाबत चौकशी व्हावी, अशी मागणी आता नागरिक करीत आहेत.

## घाटसावळी येथे दोन गटात मारहाण; पाच आरोपी अटक

पिंपळनेर-प्रतिनिधी बीड तालुक्यातील घाटसावळी येथे बुधवार दिनांक ११ जून रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास दोन गटामध्ये तु ंबळ हाणामारी झाली. यामध्ये १० जण गंभीर जखमी झाले. या प्रकरणात पाच आरोपींना पोलिसांनी अटक केली. याबाबत सविस्तर वृत्त असे की बीड तालुक्यातील घाटसावळी येथे बुधवार दिनांक ११ जून रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास शेतीच्या जुन्या कारणावरून दोन गटात वाद झाला. सुरुवातीला बाचाबाची झाली. या बाचाबाचीचे रूपांतर तु ंबळ हाणामारी मध्ये झाले. यामध्ये आठ ते दहा जण गंभीर जखमी झाले असून जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी रामेश्वर आसाराम लांडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सुग्रीव नामदेव लांडे, मसु नामदेव लांडे, रेवननाथ लांडे, नामदेव लांडे प्रकाश लांडे या पाच आरोपींच्या विरोधात पिंपळनेर पोलिसांनी भादवि कलम ३०७, १०९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. सदरील आरोपींना पोलिसांनी अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास डीवायएसपी पूजा पवार ह्या करत आहेत.

## जिल्ह्यातील मराठी शाळा बंद पाडण्याचा प्रशासनाचा डाव-रानबा गायकवाड

परळी-प्रतिनिधी बीड जिल्ह्यात सर्वसामान्य कुटु ंबातील हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून असलेल्या बीड जिल्ह्यातील अनेक माध्यमिक शाळांच्या संचमान्यता ० दाखवून सदरील शाळा संचमान्यतेच्या नावाखाली बंद पाडण्याचा प्रशासनाचा डाव असल्याचे मत जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांनी केले आहे.तसेच जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी व मराठीप्रेमी नागरिकांनी प्रशासनाचा हा डाव हाणून पाडण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. याबाबत प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात रानबा गायकवाड यांनी म्हटले आहे की,राज्य सरकारच्या मराठी शाळांच्या उदासीन धोरणामुळे आणि इंग्रजी प्रेमापोटी जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा बंद पडत आहेत.तर राज्यातील अनेक शाळा उद्योजकांच्या घशात घातल्या आहेत.त्यामुळे सर्वसामान्य, गोरगरीबांना शिक्षण घेणे अवघड होणार आहे. बीड जिल्ह्यात पटसंख्याचे कारण पुढे करून सुमारे २० पेक्षा अधिक हायस्कूल शाळांची जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने ० पटसंख्या दाखवून संच मान्यता दिलेली नाही.तर इयत्ता ९ वी आणि १० वीसाठी एकही शिक्षक मान्यता नाही.

## शेतकऱ्यांची कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी मा.बच्चु भाऊ कडु यांच्या अन्नत्याग आंदोलनाला लिंबागणेशकरांचा पाठिंबा :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:-( दि.१४ ) शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफीसह , शेतीमालाला हम ीभाव, शेतमजूर,दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी, विविध प्रश्नासंदर्भात प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चु भाऊ कडु यांचे राष्ट्रसंतांच्या महासमाधीपुढे गुरूकुंज मोझरी येथे गेल्या ७ दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू असुन बच्चु कडु यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे कटु सत्य असुन शेतमालाला भाव नाही, राज्यात शेतकरी आत्म हत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. सत्ताधा-यांनी निवडणुकीत दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पाळले नाही. आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी




हताश होऊन टोकाचे पाऊल उचलुन आपले जीवन संपवत आहे. अवकाळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मि ळत नाही.जगाचा पोशिंदा बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. त्याम ुळे मा.बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ आज दि.१४ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेशकरांनी मुख्य प्रवेशद्वार याठिकाणी बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ व शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे ङ्ग शेतीमालाला हम ीभाव मिळालाच पाहिजे, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरणङ्ग अशी घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. शेतकरी कर्जमाफीसह प्रमुख मागणीसह ईतर मागण्या मान्य करून बच्चु भाऊ कडु यांच्या जिवीतास धोका असुन परिस्थिती चिघळण्या अगोदरच बेमुदत आमरण उपोषण सोडवण्याची मागणी करत बच्चु भाऊ कडु यांना ईमेल द्वारे आपला पाठिंबा दर्शविला आहे. निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवले आहे.यावेळी राजेभाऊ गिरे, भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निमर्ळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष नितिन सोनावणे, विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, संतोष भोसले, सय्यद अख्तर, सुरेश निमर्ळ,आरूण निमर्ळ, राहुल जाधव, तुकाराम गायकवाड, रामदास मुळे, अर्जुन गोंडे,आश्रुबा गिरे, भगवान मोरे, रामकिसन गिरे,लहु घोलप, दत्ता घरत, तुषार गायकवाड,शहाजी वाणी, भालचंद्र गिरे,लहु घोलप आदी सहभागी होते.

# बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे रस्तालगत अतिक्रमण - वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका

बीड, दि. २०-शहरातील जालना रोड ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ तसेच बार्शी नाका परिसरातील अतिक्रमण पुन्हा जैसे थे झाले असून बांधकाम विभाग व नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष याला कारणीभूत ठरत आहे. अलीकडेच मोठ्या गाजावाजात ही अतिक्रम णे हटवण्यात आली होती. मात्र काही दिवसांतच अनधिकृत शेड्स, टपऱ्या, फलक पुन्हा उभे राहिल्याने नागरिकांच्या त्रासात भर पडली आहे.बार्शी रोड हा बीड शहराचा प्रमुख मार्ग असून परळी, सोलापूरसारख्या भागातून येणारी वाहतूक याच म ार्गावरून होते. लगतच्या लॉन्समध्ये लग्नसराईमुळे वाहनांची गर्दी होते, मात्र पार्किंगची सोय नसल्याने रस्त्यावरच वाहने लावली जातात. त्यामुळे बार्शी नाका चौकात सतत वाहतूक कोंडी होते.बस स्टॅन्ड व छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, पेट्रोल पंपाजवळ रस्त्यावरच ट्रॅव्हल्सवाहने उभी केली जात असल्याने वाहतूक पोलीस याकडे कानाडोळा करताना दिसतात. एकेकाळी नो पार्किंग झोनमध्ये जॅमर लावून कठोर कारवाई केली जात होती, मात्र सध्या ती पूर्णपणे थांबली आहे.

बस स्टॅन्ड रोडच्या दुतर्फा अनधिकृतपणे उभ्या असलेल्या शेड्स, टपऱ्यांमुळे रस्ता अरुंद झाल्याने सतत वाहतूक कोंडी निर्माण होते. या भागात संत सोमेश्वर मंदिर, भगवान बाबा मंदिर असल्याने म ोठ्या संख्येने भाविक येत असतात. याशिवाय, ज्ञानेश्वर पब्लिक इंग्लिश स्कूलमुळे विद्यार्थी, पालक, महिला यांना दररोज अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे.

तिडके हॉस्पिटल, रेणू हॉस्पिटल याच रस्त्यावर असल्याने रुग्णवाहिकांना

( बीड शहरातील मुख्य बस स्टॅन्ड परिसर सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. कारण, येथे ट्रॅव्हल्स आणि रिक्षा पॉईटवर कायद्याच्या अटी-शर्तीचे खुलेआम उल्लंघन होत असतानाही, संबंधित पोलिस यंत्रणा डोळेझाक करत असल्याचा आरोप अनेक नागरिक व स्थानिक व्यावसायिकांकडून केला जात आहे )

देखील वेळेवर प्रवेश मिळत नाही. गॅरेज चालक रस्त्यावरच रिक्षा व म ोटरसायकल उभ्या करतात, ज्यामुळे सामान्य नागरिकांना जिवावर उदार होऊनच या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो.

स्थानिक प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन अतिक्रमण कायमस्वरूपी हटवावे, वाहतूक पोलीस व बांधकाम विभाग यांच्यात समन्वय साधून रस्ता मोकळा ठेवावा अशी नागरिकांची म ागणी आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com